# (Day-4) इतिहास

**पेपर क्र. 34 दळणवळण, जमीन महसुल आणि शेतकरी आंदोलने**

1. **ब्रिटीश राजवटीत भारतामध्ये रयतवारी महसूल पद्धत सुरू करण्याशी खालीलपैकी कोणाचा संबंध होता/होता?**
अ) लॉर्ड कॉर्नवॉलिस ब) अलेक्झांडर रीड क) थॉमस मनरो
**पर्यायी उत्तरे :**
1) फक्त अ 2) फक्त अ आणि क 3) फक्त ब आणि क 4) फक्त ब

2. **पुढीलपैकी कोणत्या व्यक्तीने कोकणामध्ये रयतवारी जमीन महसूल पद्धत लागू केली?**
1) लॉर्ड एल्फिन्स्टन 2) जॉन माल्कम 3) ग्रँड डफ 4) नेपियन्स

3. **महाराष्ट्रातील जमीन महसूल पद्धतीविषयी अयोग्य असलेली विधाने ओळखा.**
अ) 1796 साली गादीवर आलेल्या बाजीरावने लोकांकडून पैसा मिळविण्यासाठी ‘जमीन लिलाव’ची पद्धत सुरू केली.
ब) कायमधारा व रयतवारी या दोन्हीही प्रचलित महसूल पद्धती मराठी मुलखात पचण्यासारख्या नाहीत असे एल्फिन्स्टनला माहीत होते.
क) एल्फिन्स्टनने महाराष्ट्रात मौजेवर पद्धतीचा स्वीकार केला.
ड) ग्रण्ड डफच्या नेतृत्वाखाली ‘साताऱ्यात रयतवारी पद्धती रूढ करण्यात आली होती.
**पर्यायी उत्तरे :**
1) फक्त अ 2) फक्त ब 3) फक्त क 4) यापैकी नाही.

4. **रयतवारी पद्धतीत व्यक्तीला पुढीलपैकी कोण / कोणते अधिकार होते?**
अ) जमीन स्वतः कसणे.
ब) जमीन विकणे.
क) वडिलोपार्जित जमिनीत सर्व मुलांना समान हिस्सा मिळविणे.
ड) जमीन दुसऱ्यास मोबदला देऊन कसणे.
इ) जमीन दान देणे.
**पर्यायी उत्तरे :**
1) ड व इ सोडून सर्व 2) फक्त इ सोडून सर्व
3) फक्त ब सोडून सर्व 4) वरीलपैकी सर्व

5. **महाराष्ट्रातील ‘रयतवारी पद्धतीचा’ पहिला प्रयोग पुढीलपैकी कोणत्या ठिकाणी करण्यात आला होता?**
1) खानदेश 2) ठाणे 3) सातारा 4) इंदापूर

**6. रयतवारी जमीन महसूल पद्धतीविषयी अयोग्य विधान ओळखा.**

1) इ.स. 1792 साली रयतवारी पद्धती सर्वप्रथम कर्नल रीडद्वारा बारा महल जिल्ह्यांत लागू केली

2) इ.स. १८४७ साली मुंबई प्रांतातही ही पद्धती लागू केली.

3) रयतवारी पद्धतीत जमीन महसूल स्थायी स्वरूपाचा होता.

4) मनरो मद्रास प्रांताचा गव्हर्नर झाला तेव्हा ही रयतवारी पद्धती संपूर्ण मद्रास प्रांतात लागू केली.

**7. 'मुंबई प्रांतात रयतवारी पद्धत दीर्घकाळ चालू आहे आणि आमच्या ग्रामीण समाजाच्या लोकशाही घडणीस तीच योग्य आहे. आमची एवढीच मागणी आहे की, रयतांच्या जमिनीचा सारा कायम स्वरूपाचा करावा.' रयतवारी पद्धतीबाबत हे विधान कोणाचे होते?**

1) लोकमान्य टिळक 2) गोपाळ नरसिंह देशमुख

3) न्या. महादेव गोविंद रानडे 4) गोपाळकृष्ण गोखले.

**8. कोणी 'दीनमित्र' या पत्राच्या प्रारंभीच्या ७ अंकांतून (नोव्हेंबर, डिसेंबर १९११) शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती व ती घालवण्याचे उपाय ही ७ लेखांची लेखमाला लिहिली?**

1) मुकुंदराव पाटील 2) दिनकरराव जवळकर

3) अण्णासाहेब लठ्ठे 4) तुळशीदास जाधव

**9. मुंबई कायदे मंडळात खोती पध्दती विरुद्ध......... व .......... यांनी आवाज उठविला होता.**

1) आनंदराव सुर्वे आणि सी. के. बोले

2) सी. के. बोले. आणि बाबासाहेब आंबेडकर

3) सी. के. बोले आणि वी. रा. शिंदे

4) बाबासाहेब आंबेडकर आणि वि. रा. शिंदे

**10. शेतकरी कामगार पक्षाच्या मुखपत्राचे नाव काय होते?**

1) लोकसत्ता 2) कामगारसत्ता 3) जनसत्ता 4) देशसत्ता

**11. खालीलपैकी शेतकरी कामगार पक्षाच्या कोणत्या नेत्याने 'जनसत्ता' मध्ये 'कर्नाटकी बंड व महाराष्ट्र थंड' या शीर्षकाचे लेख लिहून संयुक्त महाराष्ट्र चळवळीसाठी जनमत जागृत करण्याचे कार्य केले ?**

1) सेनापती बापट 2) शंकरराव मोरे 3) केशवराव जेधे 4) केशवराव ठाकरे

**12. अखिल भारतीय क्षत्रियांच्या सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना १९एप्रिल १९१९रोजी ते म्हणाले होते, 'मी तुमच्यापैकीच आहे, मला मजूर अगर शेतकरी समजा. माझे वाडवडील हाच धंदा करीत होते. जे काम माझे पूर्वज करीत होते तेच काम करणाऱ्या लोकांचा अध्यक्ष होण्याकरिता मला आज बोलाविले आहे, याबद्दल अत्यानंद होत आहे.'**

**वरील उद्गार कोणत्या व्यक्तीचे आहेत?**

1) विठ्ठल रामजी शिंदे 2) महात्मा गांधी

3) राजश्री शाहू महाराज 4) महाराजा सयाजीराव गायकवाड

13. **'द डेक्कन ॲग्रिकल्चरल रिलीफ ॲक्ट' (1879) मध्ये पुढीलपैकी कोण/कोणत्या तरतुदी होत्या?**

अ) शेतकऱ्याचे कर्ज एकदाच वसूल करू नये.

ब) सावकाराला शेतकऱ्याची जमीन अत्यंत निकड वाटल्याशिवाय खरेदी करण्यास कोर्टाने मज्जाव करावा.

क) निकाल मान्य नसेल तर फौजदारी कोर्टामार्फत निकाल व्हावा.

ड) नवीन उपाय म्हणून 'शेतकरी बँका' सुरू कराव्यात.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, ब, क　2) ब, क, ड　3) अ, ब, ड　4) वरीलपैकी सर्व

14. **दिलेल्या विधानांचा विचार करून योग्य पर्याय निवडा?**

अ) इ.स. 1933 मध्ये एन. जी. रंगा यांनी आंध्र प्रदेशातील गुंटर जिल्ह्यातील निदोबोलू येथे भारतीय कृषिक संस्था स्थापन केली.

ब) त्यामध्ये शेतकऱ्यांना शेतकरी चळवळीचे सक्रिय कार्यकर्ते बनण्याचे प्रशिक्षण दिले जाई.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ बरोबर ब चूक आहे.　2) फक्त ब बरोबर अ चूक आहे.

3) दोन्ही विधाने चूकीची आहेत.　4) दोन्ही विधाने बरोबर आहे.

15. **1875-76 मध्ये झालेले दख्खनचे दंगे महाराष्ट्रातील कोण/कोणत्या तालुक्यामध्ये झाले होते?**

अ) शिरूर, मावळ　ब) इंदापूर ,हवेली　क) पारनेर, कर्जत　ड) श्रीगोंदा

**पर्यायी उत्तरे :**

1) अ सोडून सर्व　2) क सोडून सर्व　3) ड सोडून सर्व　4) वरीलपैकी सर्व

16. **मध्यवर्ती रेल्वे मंडळाची स्थापना कोणत्या कायद्याने झाली?**

1) 1909 चा कायदा　2) 1919 चा कायदा　3) 1935 चा कायदा　4) 1947 चा कायदा

17. **भारतातील पहिली पॅसेंजर रेल्वे सेवा बोरीबंद ते ठाणे या मार्गावर सुरू झाली या रेल्वे मार्गाची आखणी व सर्व्हे करण्याचे काम खालीलपैकी कोणत्या अधिकाऱ्याने केले?**

1) ले. प्रेस्कॉट　2) जॉर्ज क्लार्क　3) रॉबर्टसन　4) विलोग्बी

18. **नोव्हेंबर १८४९ रोजी इंग्लंडमधील अभियंत्यांनी भारतात रेल्वे सुरू करण्याची जबाबदारी खालीलपैकी कोणत्या व्यक्तीवर सोपवली होती?**

1) सर विलोग्बी　2) सर थॉमस एरस्किन पेरी

3) जेम्स जॉन बर्कले　4) लॉर्ड जे. स्टुअर्ट वॉर्ली

19. **पुढील विधानांचा विचार करून योग्य विधाने निवडा**

अ) रेल्वे व रस्ते वाहतुकीत समन्वय प्रस्थापित व्हावा या करिता उपाय योजना सुचविण्यासाठी १९३२ मध्ये सरकारने श्री. के. जी. माइकल व श्री. एल.एच. किर्कनस यांची समिती स्थापन केली.

ब) १९१९ च्या माँटेग्यू चेम्सफर्ड अहवालाने रस्ते ही प्रांताऐवजी केंद्र सरकारची जबाबदारी बनली.

क) सर जॉन लॉरेन्स व लॉर्ड मेयो यांनी मध्यम रुंदी (मिटरगेज) रेल्वेमार्ग निर्माण करण्याची शिफारस केली.

सेवेसाठी ज्ञानार्जन

ड) १९०७ मध्ये रेल्वे प्रशासनाची आर्थिक बाजू तपासण्यासाठी मॅक समितीची स्थापना करण्यात आली.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, ब, क 2) ब, क, ड 3) अ, क, ड 4) वरीलपैकी सर्व

**20. रेल्वे संदर्भात पुढील विधानांचा विचार करा, चूक विधान सांगा.**

1) मुंबई ते ठाणे हा भारतातील पहिला रेल्वेमार्ग होय.

2) इ.स. १८६१ मध्ये मुंबई ते नाशिक हा रेल्वेमार्ग तयार झाला.

3) इ.स. १८८५ मध्ये भारतीय रेल्वे बोर्डाची स्थापना झाली.

4) रेल्वेमार्ग बांधण्याचा हेतू सैनिकांची जलद वाहतूक व आयात–व्यापारास प्रोत्साहन हा होता.

**21. महाराष्ट्रात पहिली विजेवर चालणारी रेल्वे सेवा ..... साली ..... या ठिकाणाहून सुरू करण्यात आली.**

1) भायखळा ते ठाणे 1925 2) दादर ते बांद्रा 1918

3) मुंबई ते कुर्ला 1925 4) दादर ते बोरीवली 1925

**22. मुंबईमध्ये 1907 मध्ये विजेवरील ट्राम सेवा पुढीलपैकी कोणत्या मार्गावर धावली होती ?**

1) कुलाबा ते पायधुनी 2) मुंबई महानगरपालिका ते क्रॉफर्ड मार्केट

3) बोरीबंदर ते ठाणे 4) ठाणे ते कुलाबा

**23. वर्णनावरून व्यक्ती ओळखा.**

अ) 1845 – ‘रस्ते आणि तळे’ खात्यात हिशोबनीस म्हणून नोकरीस होते.

ब) 1848–50 – अहमदनगर न्यायालयात कारकून म्हणूनही काम पाहिले.

क) 1851 – ‘रेव्हेन्यू सर्वे खात्यात’ वरिष्ठ लिपिक म्हणून काम.

ड) 1853 – ‘महार–मांग इत्यादींना विद्या शिकवणारी मंडळी’ चे ते अध्यक्ष होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) हरिभाऊ चव्हाण 2) सदाशिव बल्लाळ गोवंडे

3) मोरो विठ्ठल वाळवेकर 4) रामचंद्र धामणस्कर

**24. महाराष्ट्रातील पहिली कागदाची गिरणी डेक्कन पेपर मिल्स लिमिटेड नावाने 1887 मध्ये ....... येथे सुरू झाली.**

1) मुबंई, कुर्ला 2) पुणे, मुंढवा

3) अहमदनगर, बेलापूर 4) पुणे, जुन्नर

**25. 1879 च्या डेक्कन ॲग्रीकल्चर रिलीफ ॲक्ट मध्ये पुढीलपैकी कोणत्या तरतुदी होत्या ?**

अ) न्यायालये शेतकऱ्याच्या कर्जावर योग्य व्याज ठरवू शकणार होती.

ब) कर्जदाराची जमीन विकली जाण्याची वेळ येणार नव्हती.

क) कर्ज फेडले नाही म्हणून कर्जदाराला तुरुंगात टाकता येणार नव्हते.

ड) जमिनीवरील कराचा दर कमी केला होता.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, ब आणि क 2) ब, क आणि ड 3) अ, क आणि ड 4) अ, ब आणि ड

रयत प्रबोधिनी
सेवेसाठी ज्ञानार्जन